**ठळक बातम्या**

- भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून प्रतिपादन

- ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं दीर्घ आजारानं निधन

- कोलंबियात बसवर झालेल्या बॉम्बहल्ल्यात १३ जणांचा मृत्यू, ३८ जण जखमी

**आणि**

- आयपीएलमध्ये आजचा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात होणार

**<><><><><>**

भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असून याच विचारानं आपले शास्त्रज्ञ नागरी अणू कार्यक्रम पुढे नेत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधत होतो हा या कार्यक्रमाचा १३३वा भाग होता. काही दिवसांपूर्वीच तामिळनाडूच्या कल्पक्कम इथल्या फास्ट
ब्रीडर रिॲक्टरनं क्रिटिकॅलिटीचा टप्पा गाठल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. हे अणू संयंत्र पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानानं तयार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. हे यश देशाच्या अणू ऊर्जा क्षेत्राच्या वाटचालीतला महत्वाचा टप्पा असल्याचं ते म्हणाले. हे यश साध्य करण्यात योगदान दिलेल्या सर्वांचं त्यांनी अभिनंदन केलं. यामुळे विकसित भारताच्या संकल्पालाही नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**होल्ड बाईट - नागरी अणु कार्यक्रम**

यानिमित्तानं त्यांनी पवन ऊर्जा क्षेत्रातल्या अलिकडच्या यशाबद्दलची माहिती दिली. आता भारताची पवन ऊर्जा निर्मिती क्षमता ५६ गिगावॉटपेक्षा जास्त झाली आहे, गेल्या एका वर्षभराच्या काळात यात सुमारे ६ गिगावॅट नव्या क्षमतेची भर पडली असल्याचं त्यांनी सांगितलं. आज भारत पवन ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, हे आपल्या अभियंत्यांचं, युवा वर्गाच्या परिश्रमाचं तसंच देशाच्या सामूहिक इच्छाशक्तीचं प्रतीक असल्याचं ते म्हणाले. या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

येत्या काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार असल्याचं स्मरण करून देत त्यांनी बुद्ध विचारांचं महत्व अधोरेखित केलं. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच होते आणि स्वतःवर विजय मिळवणं हाच सर्वात मोठा विजय असतो, ही त्यांची शिकवण होती. तणाव आणि संघर्षाच्या स्थिती असलेल्या आजच्या जगात भगवान गौतम बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत असं ते म्हणाले. सर्वांनी जीवनात शांतता राखावी असं आवाहन त्यांनी केलं.

देशाच्या विविध भागांत निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. निसर्ग आणि मानव वेगवेगळे नसून आपण एकमेकांचे सोबती आहोत, ज्यावेळी आपण निसर्गाचा विचार करतो आणि त्याच्या सोबत वाटचाल करतो, तेव्हा बदल स्पष्टपणे दिसून येतो, असं त्यांनी सांगितलं.

तंत्रज्ञानाच्या मदतीनं ऐतिहासिक दस्तऐवजांचे संवर्धन करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दलही त्यांनी सांगितलं. भारतीय राष्ट्रीय अभिलेखागारानं एका पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या ऐतिहासिक दस्तऐवजांविषयी त्यांनी माहिती दिली. नागरिकांनी www.abhilekh-patal.in या संकेतस्थळाला भेट देऊन हे दस्तऐवज पाहावेत, असं आवाहन त्यांनी केलं.

फ्रान्समध्ये झालेल्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाचं कौतुक त्यांनी केलं. या पथकातील मुंबईच्या श्रेया मुंदडा हिचा उल्लेखही त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. देशाच्या मुलींमध्ये ऑलिम्पियाडची संस्कृती वेगानं लोकप्रिय होऊ लागली असून, यासाठी मुलींना पाठबळ देणाऱ्या पालकांचंही त्यांनी कौतुक केलं.

सध्या देशभरात सुरू असलेल्या जनगणना २०२७ ची माहितीही प्रधानमंत्र्यांनी दिली. यंदा जनगणना डिजिटल पद्धतीनं राबवली जात असून, या प्रक्रियेअंतर्गत जनगणनेचे कर्मचारी आपल्याकडे येण्याआधी १५ दिवस नागरिक स्वतः स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण करू शकतात, अशी माहिती त्यांनी दिली.

भारतानं चीज उत्पादनात केलेल्या प्रगतीबद्दल आणि विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण चीज उत्पादनांबद्दल माहिती प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मधून दिली. भारताची चव, परंपरा आणि गुणवत्ता जगभरातील लोकांना एक नवा अनुभव देईल आणि भारतासोबत एक नवं नातं निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

१८५७ चा पहिला स्वातंत्र्यलढा मे महिन्यातच सुरू झाल्याचं स्मरण त्यांनी करून दिलं. या उठावाच्या निमीत्तानं लोकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या भारतमातेच्या वीर सुपुत्रांना नमन केलं. मे महिना हा शाळकरी मुलांच्या सुट्टीचा काळ असल्यानं मुलांनी सुट्टीत आनंद लुटण्यासोबतच काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा आणि उन्हाळ्यात आपल्या आरोग्याचीही पूर्ण काळजी घ्यावी, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी प्रचारसभा आणि रोड शो करणार आहेत. आज दुपारी ते ठाकुरनगर इथं सभा घेतील, त्यानंतर मातुआ ठाकुर मंदिरात दर्शन घेऊन पूजा करतील. त्यानंतर त्यांची सभा हरिपाल इथं होणार आहे. तसंच ते थंथनिया काली बारी

मंदिरालाही भेट देऊन पूजा करणार आहेत. आज संध्याकाळी ते कोलकाता इथं रोड शो घेतील. तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी हेदेखील आज विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, काँग्रेस आणि इंडियन सेक्युलर फ्रंट या पक्षांचे नेतेही राज्यभरात प्रचारात उतरणार आहेत.

**<><><><>**

ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं आज पहाटे नवी दिल्ली इथं दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. १८ डिसेंबर १९४२ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतात ‘झांग’ इथं जन्मलेले रघु राय हे एक स्थापत्य अभियंता होते. पण वयाच्या २३व्या वर्षीच त्यांनी छायाचित्रण करायला सुरुवात केली, आणि १९६६ मध्ये 'द स्टेट्समन' या वृत्तपत्रात प्रमुख छायाचित्रकार म्हणून ते रुजू झाले. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीची पुढली सहा दशकं भारताच्या सामाजिक-राजकीय पटलावरच्या अनेक घडामोडींची साक्ष ठरली.

१९७२ मधली बांगलादेश निर्वासितांची समस्या, १९८४ची भोपाळ वायू दुर्घटना यासारख्या देशाच्या आधुनिक इतिहासातल्या काही अत्यंत संवेदनशील घटना त्यांनी आपल्या कॅमेरात टिपल्या. ख्यातनाम व्यक्तींच्या छायाचित्रांमधून त्यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक छटा टिपल्या, आणि या व्यक्तींच्या जीवनाकडे पाहण्याचा आतापर्यंत अज्ञात असलेला नवा दृष्टिकोन सादर केला.

प्रामुख्यानं कृष्ण-धवल माध्यमातल्या आपल्या छायाचित्रांमधून त्यांनी अत्यंत सामान्य गोष्टींनाही असाधारण रूप दिलं. आपल्या प्रदीर्घ, गौरवशाली कारकिर्दीत, राय यांनी भारतातल्या काही अग्रगण्य मासिकांबरोबर काम केलं. गेल्या काही वर्षांत, त्यांचे छायाचित्र-निबंध 'टाइम', 'लाईफ', 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द इंडिपेंडंट' आणि 'द न्यू यॉर्कर' यासारख्या जगप्रसिद्ध प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झाले. ‘रघु रायज इंडिया: रिफ्लेक्शन्स इन कलर अँड रिफ्लेक्शन्स इन ब्लॅक अँड व्हाईट’ आणि

‘एक्स्पोजर: पोर्ट्रेट ऑफ अ कॉर्पोरेट क्राईम’ यासारखी काही पुस्तकंही त्यांनी लिहिली. राय यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. बांगलादेश युद्ध आणि त्यानंतरच्या घडामोडींच्या वार्तांकनासाठी भारत सरकारनं १९७२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्कारानं सन्मानित केलं. रघु राय यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी नवी दिल्लीत लोधी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

नैर्ऋत्य कोलंबियात काल एका बसवर झालेल्या बॉम्बहल्ल्यात १३ जणांचा मृत्यू झाला तर ३८ जण जखमी झाले. काजिबियो भागात पॅन-अमेरिकन महामार्गावर झालेला हा हल्ला, अमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित असल्याची माहिती कोलंबियाच्या लष्कर प्रमुखांनी दिली. कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात होणार आहे. चेन्नईत एम. ए. चिदंबरम मैदानावर दुपारी साडे तीन वाजता या सामन्याला सुरुवात होईल. आजचा दुसरा सामना लखनौ सुपर जायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्समध्ये होणार आहे. लखनौच्या अटल बिहारी वाजपेयी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. काल जयपूर इथे झालेल्या पहिल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा ५ गडी राखून पराभव केला. राजस्थान रॉयल्सने दिलेलं २२९ धावांचं लक्ष्य हैदराबाद संघाने एकोणिसाव्या षटकातच पूर्ण केलं. कालच्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्जने दिल्ली कॅपिटल्सवर सहा गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><>//**